Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# बागलाण तालुक्यातील हरणबारी जलप्रकल्पामुळे शेती विकासात झालेला बदल

**प्रा.यशवंत भगवंत जाधव**
**प्रा .सचिन संतोष पवार**
**कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
**सटाणा जि.नाशिक.**

**प्रस्तावना :-**

निसर्गातील अनेक साधन संपत्तीपैकी पाणी ही एक सजीवांसाठी एक महत्वाची साधन संपत्ती आहे. मानवी हस्तक्षेपामुळे व निसर्गाच्या लहरीपणामुळे त्यांचे प्रमाण सातत्याने कमी होतांना दिसून येत आहे. मानवाच्या संपूर्ण आर्थिक प्रक्रिया व कृषी विकास हा नैसर्गिक जलसंपत्तीवर असून त्याचे महत्व मानवाला समजून आलेले आहे . त्यासाठी हल्लीच्या काळात जलसिंचन प्रकल्पाची बांधणी करून भूजल पातळी वाढवण्यासाठी धरणे, ही काळजी गरज कालवे यांची बांधणी करून वेळोवेळी जल आवर्तनाच्या स्वरुपात तेथील पाणलोट क्षेत्राचा कृषी विकासासाठी खूप महत्व आहे. प्रस्तुत शोध निबंधात बागलाण तालुक्यातील तापी नदी खो-यातील मोसम नदी हरणबारी जलप्रकल्प तसेच आराम नदीवरील केळझर जलप्रकल्प यांच्या जलासिंचानाचा वापर करून तेथील पाणलोट क्षेत्राचा कृषी, पिक पद्धतीचा व उत्पनाचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र-**


बागलाण हा तालुका नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेस असून तो आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो.या तालुक्याच्या पश्चिम दिशेला गुजरात राज्य व कळवण तालूका, उत्तर दिशेला धुळे जिल्हा,पूर्वेला मालेगाव तालुका व दक्षिणेला देवळा तालुका आहे. बागलाण तालुक्याचे एकून क्षेत्रफळ १९९३४,०३हेक्टर असून तालुक्यात १७२ गावांचा समावेश होतो.२०११ च्या जनगणनेनुसार बागलाण तालुक्याची लोकसंख्या ३७४४३५ इतकी आहे. बागलाण तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ४४८ मी.मी आहे तर आरम व मोसम या प्रमुख नदया आहेत. बागलाण तालुक्याच्या पश्चिमेस साल्हेर पर्वतावर आरम नदीचा उगम झाला असून हि नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असून तिची एकूण लांबी ३६ किमी आहे.बागलाण तालुक्याचा अक्षवृतीय विस्तार २०.५९’उ ते २०० ५२’उ व रेखावृतीय विस्तार ७४०१२’पू ते ७४०५६’ पू असा आहे.बागलाण तालुक्याच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा असून साल्हेर हे महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे उंचशिखर आहे.बागलाण तालुक्याचे पूर्व-पश्चिम अंतर ४४ कि.मी तर दक्षिण-उत्तरअंतर ३७ कि.मी आहे.

उद्दिष्टे :.

1) हरणबारी जल प्रकल्पाचा अभ्यास करणे.
2) हरणबारी व जलप्रकल्पाचे बागलाण तालुक्यातील कृषी विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.
3) हरणबारी जलप्रकल्पाच्या बागलाण तालुक्यातील सिंचन क्षेत्राचा अभ्यास करणे.

**सामुग्री संकलन व संशोधन पद्धती :-**


प्रस्तुत संशोधन निबंधाचा माहिती स्त्रोत हा प्राथमिक आणि दुय्यम पद्धतीचा असून ही माहिती क्षेत्र भेटी,मुलाखत या साधनाद्वारे मिळवली असून दुय्यम स्वरुपाची ही माहिती पुस्तकीय संदर्भ, गव्हरमेंट गॅझेट शासकीय,निमशासकीय विभागातील नोंदी, संदर्भ ग्रंथातील माहितीचा उपयोग व इंटरनेटच्या मदतीने प्राप्त करून त्या माहितीवर सांखिकी साधनाचा वापर करून त्याचे प्रकटीकरण केले आहे.




## विषय विवेचन-

हरणबारी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम तापी खो-यातील मोसम नदीवरील नाशिक जिल्ह्यातील सटाणा शहरापासून ३५ किमी.अंतरावर अंबासन गावाजवळ करण्यात आलेले आहे. हरणबारी प्रकल्प अंतर्गत डावा उजवा सोमपूर व वाघळे कालवा व मोसम नदीवरील १८ बंधारे अंतर्भूत केले आहेत.

## हरणबारी ज प्रकल्प :



**हरणबारी प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन**

| कालवा | क्षेत्र | आवश्यक पाणी (दलघफू) |
|---|---|---|
| डावा कालवा ७ कि.मी . | ४०५ हेक्टर | १७० |
| उजवा कालवा २५ कि.मी. | रब्बी हंगाम ५७५ हेक्टर | २२९ |
| सोमपूर व वाघाळे | १४१७ हेक्टर | १८१.०० |
| मोसम साळ कालवा वाढीव शाखा | ५१८३ हेक्टर | ४५४.००+१९७.०० |
| मोसम नदीवरील १८ बंधारे | २१४६ हेक्टर | ५९२.०० |
| एकूण | ९७२६ हेक्टर | १६५३.०० |
| | पाट भरणे. | ३०.०० |
| | बाष्पीभवन | ११३.०० |
| | **एकूण** | **१७९६.००** |

**तालुका निहाय क्षेत्र :**

**हरणबारी प्रकल्प**

| तालुका | सिंचन क्षेत्र (हेक्टर) | पीक क्षेत्र(हेक्टर) |
|---|---|---|
| मालेगाव | ७५९१ | ६१२६ |
| सटाणा | ३९३५ | ६०९९ |
| **एकूण** | **९७२६** | **१२२२५** |

या शोध निबंधातून हरणबारी प्रकल्पामुळे बागलाणच्या शेती क्षेत्रातील उत्पन्न मोठया प्रमाणात येऊ लागले. पश्चिम खोऱ्यात कमी पर्जन्य शेतीसिंचन खूप मोठी समस्या होती.प्रकल्पामुळे उजव्या व डाव्या कालव्यामुळे रब्बी व खरीप हंगाम आवर्तनामुळे मुख्य पिके ( मका,कांदा, गहू, बाजरी, तूर भुईमूग व फळ पिके द्राक्षे, डाळींब, घेतली जाऊ जातात. हेक्टरी उत्पन्न 65ते 70% वाढलेले आहेत. या सिंचन प्रकल्पामुळे कृषी व्यवसाय मुबलक प्रमाणात संधी आणि परिसरचा विकास होताना दिसून येतो.

**निकर्ष :-**

जलसिंचन म्हणजे शेतीस, जमिनीस वा एखाद्या ओसाड स्थळास, भूप्रदेशास कृत्रिम रित्या पाणीपुरवठा करण्याचे विज्ञान होय. जेथे पावसाचे प्रमाण कमी असते वा नगन्य असते तेथे अशी व्यवस्था करण्यात येते , ज्याद्वारे तेथे कृषीचा विकास होऊ शकेल. प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, व आर्थिक घटकाबरोबरच जलसिंचनप्रकल्प, नद्या,कालवे याचा प्रभाव त्या क्षेत्रातील पिक पद्धतीवर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. जलसिंचन ह्या साधनामुळे मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आली आहे. भारतातील एकूण ४५० जिल्ह्यापैकी

बागायत क्षेत्र असलेल्या ४४ जिल्ह्यामधून देशाच्या अन्नधान्याचे उत्पादनापैकी ५०% उत्पादन होते.या ४४ जिल्ह्यापैकी जास्त सिंचन क्षेत्र असणाऱ्या १४ जिल्ह्यात देशाच्या २५ % अन्नधान्याचे उत्पादन मिळते यावरून शेतीसाठी जलसिंचनाचे महत्व लक्षात येते.

प्रस्तुत शोधनिबंधात बागलाण तालुक्यातील हरणबारी जलप्रकल्पाच्या सध्य स्थितिचा आढावा घेवून त्या प्रकल्पाची तेथील कृषी विकासातील भूमिकांचा अभ्यास केलेला आहे.

संदर्भ- १) डॉ.विजया साळुंके – कृषी भूगोल
२) इंडियन इकॉनॉमिक दत्त सुंदरम
३) वर्तमानपत्र एंटरनेट माध्यम
४) जलसिंचन पाटबंधारे विभाग , बागलाण महाराष्ट्र शासन